# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**सहविचार सभा**

सकाळ
पुणे, मंगळवार
२ जानेवारी २०१८
४

# डिजिटल शिक्षणाचा प्रसार गरजेचा

## ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले यांचे राजगुरूनगर येथे प्रतिपादन

[illegible]

पुणे, ९ जानेवारी २०१८ ⑨

# तंत्रज्ञानाने झालेले परिवर्तन शिक्षणात गरजेचे : डॉ. ताकवले



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित स्मार्ट स्कूल कृती सत्रासाठी उपस्थित मान्यवर.

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** जागतिक दर्जाच्या शिक्षणासाठी डिजीटल शिक्षणाचा प्रसार गरजेचा असून तंत्रज्ञानाने घडून आलेले परिवर्तन शिक्षणात वापरण्याची गरज निर्माण झाल्याचे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या स्मार्ट स्कूल कृतिसत्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, डॉ. कैलास काटे(?), डॉ. आसावरी आंबेकर(?), डॉ. बेनझिर तांबोळी, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड आणि तालुक्यातील सर्व माध्यमिक उच्चमाध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य उपस्थित होते.

डॉ. राम ताकवले म्हणाले, शिक्षणाचा विचार गुणवत्ता व उपजीविकेच्या दृष्टीने व्हायला हवा. शिक्षण हे परिवर्तनाचे माध्यम असून त्यातून जीवनाचा मार्ग सापडायला हवा. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना एकलव्याप्रमाणे स्वावलंबनाने शिकायला हवे. शिक्षकाची भूमिका मुलांना माहिती किंवा ज्ञान देण्याची नसून त्यांना घडविण्याची आहे. त्यासाठी मुलांना मार्ग दाखविण्याची क्षमता शिक्षकांमध्ये निर्माण व्हायला हवी. यासाठी त्यांनी तंत्रज्ञानाची मदत घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया डिजिटल करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी, सूत्रसंचालन प्रा. शिल्पा टाकळकर यांनी तर आभार प्रा. ए. बी. काळे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख